MHJG060044112026

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६२०/२०२६
राजेंद्र गोसावी - वि- महाराष्ट्र शासन
आदेश निशाणी क्र.१ वर

## निशाणी क्र.१ वर आदेश
## (दि.०४/०८/२०२६ रोजी पारित)

अर्जदाराने प्रस्तुत अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ५०३ अन्वये जप्त वाहन परत मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथन असे की, त्यांचे मालकीचे अशोक ले लँड कंपनीचे वाहन मॉडेल क्र.U–2518TBSIV त्याचा नोंदणी क्र.MH–19–CY–4739, चेसिस क्र.MB1HTLHD2KRFC2363 व इंजिन क्र.KFHZ109383 हे वाहन जळगाव (तालुका) पोलीस ठाणे, जळगाव येथे गुन्हा नोंदणी क्र.१६४/२०२६, भा.न्या.संहीता, २०२३ चे कलम ३०३(२) मध्ये तपासकामी जप्त करण्यात आलेले असुन सदर वाहनाचा तात्पुरत्या स्वरूपात ताबा मिळण्याची विनंती केलेली आहे.

३. तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे **निशाणी क्र.५** वर सादर केले असुन त्यात त्यांनी वाळची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आले आहे, जप्त वाहनावर मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव व मा. तहसिलदार, जळगांव यांचे दंडात्मक कारवाई होणे आवश्यक आहे. जप्त वाहन करारनाम्यावर दिलेले असल्याने वाहनाच्या मालकीबाबत चौकशी करणे बाकी आहे. सदर जप्त वाहन अर्जदारास परत दिल्यास पुन्हा अशाच प्रकारचा गुन्हा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचे जप्त वाहन अर्जदारास परत देण्यांस हरकत घेतली आहे.

४. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे **निशाणी क्र.१** वर सादर केले असुन त्यात वाळची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आले आहे, जप्त वाहनाचा पुन्हा वापर होवु शकतो, वाहनाची आर.टी.ओ. कडुन तपासणी करणे बाकी आहे, तहसिल कार्यालयाकडुन कार्यवाही बाकी आहे. त्यामुळे जप्त वाहन ताब्यात देवु नये असे अशी विनंती केली आहे.

**५.** तहसीलदार, जळगाव यांना सदर प्रकरणाबाबत खुलासा सादर करण्याबाबत नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापि, त्यांचेकडून कोणताही खुलासा प्राप्त न झाल्याने दि. ०४/०७/२०२६ रोजीच्या आदेशान्वये त्यांच्या म्हणण्याविना अर्जाचा विचार करण्यात आलेला आहे.

**६.** अर्जदाराने अर्जाच्या समर्थनार्थ प्रथम खबर अहवालाची प्रत, वाहन परवान्याची पडताळीत प्रत, अर्जदाराचे आधारकार्डाची प्रत, विम्याची प्रत अशी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत.

**७.** अभिलेखावर दाखल केलेले कागदपत्रांवरुन, जप्त वाहन हे अर्जदार राजेंद्र देवगिर गोसावी यांनी मुस्ताक दाऊद पिंजारी यांना भाडेपट्टयावर दिलेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. यावरुन सदर वाहनाच्या मालकीबाबत अर्जदाराचा प्रथमदर्शनी हक्क सिद्ध झालेला आहे. परिणामी, अर्जदारास वाहनाचा तात्पुरता ताबा देण्यास इतर त्रयस्त इसमाचा हरकत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांवरून जप्त केलेले वाहन अर्जदार याच्या मालकी असल्याचे दिसुन येत असुन जप्त वाहनाचा ताबा तात्पुरता अर्जदारास देणे न्यायोचित होईल.

**८.** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये, जेव्हा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने संपत्तीचे अधिग्रहण केल्याची माहिती दंडाधिकाऱ्यांना दिली जाते आणि अशी संपत्ती चौकशी किंवा तपासादरम्यान न्यायालयासमोर सादर करण्यात आलेली नसते, तेव्हा दंडाधिकारी त्या संपत्तीची विल्हेवाट लावण्याबाबत किंवा तिचा कब्जा तिच्यावर हक्क सांगणाऱ्या योग्य व्यक्तीकडे सुपूर्द करण्याबाबत आदेश देऊ शकतात. तसेच सदर तरतुदीनुसार अधिग्रहीत जप्त मुद्येमालाचा कब्जा देताना त्या जप्त मुद्येमालाचा मालक कोण आहे, याबाबत दंडाधिकाऱ्यांनी योग्य ती चौकशी करणे आवश्यक आहे.

९. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी **<u>सुंदरभाई अंबालाल देसाई –वि– गुजरात शासन ए.आय.आर. २००९ पान क्र. ६३८</u>** मध्ये दिलेल्या निवाडयामध्ये असे निर्देश दिलेले आहे की, जप्त वाहने पोलीस ठाण्यात जास्त काळ न ठेवता त्यासंदर्भात लवकरात लवकर योग्य ते आदेश करावेत.

**१०.** जप्त वाहन हे तपासातील मुद्देमाल असल्यामुळे त्याची आवश्यकता तपास अथवा खटल्याच्या सुनावणीदरम्यान भासू शकते. तथापि, सदर वाहन पोलीस ठाण्याच्या आवारात उघड्यावर ठेवण्यात आलेले असून, कालांतराने ऊन, पाऊस व इतर नैसर्गिक कारणांमुळे त्याचे नुकसान होण्याची तसेच त्याचे बाजारमूल्य व उपयोगिता कमी होण्याची शक्यता आहे. जप्त केलेल्या वाहनाचे संरक्षण करणे आणि त्याची उपयुक्तता अबाधित राखणे हे न्यायहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. अशा परिस्थितीत वाहनाची ओळख कायम राहील, तसेच तपास व न्यायालयीन कार्यवाहीस कोणतीही बाधा येणार नाही. अशा परिस्थितीत, अटी व शर्तींवर अर्जदारास सदर वाहनाचा तात्पुरता ताबा देणे न्यायोचित होईल. करिता, खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) जळगाव तालुका पोलीस ठाणे, जळगाव येथील गुन्हा रजि. क्र. १६४/२०२६ मध्ये अशोक ले लँड कंपनीचे मॉडेल क्र.U–2518TBSIV त्याचा वाहन नोंदणी क्र.MH–19–CY–4739, चेसिस क्र.MB1HTLHD2KRFC2363 व इंजिन क्र.KFHZ109383 हे अर्जदार **राजेंद्र देवगिर गोसावी** यांना रु.८,००,०००/– च्या सुपुर्दगीनाम्यावर तात्पुरत्या ताब्यात देण्यात यावा.

३) अर्जदाराने सदर वाहनात कोणत्याही प्रकारचा फेरबदल, वाहनाची विक्री, हस्तांतरण, तारण अथवा कोणताही बोजा निर्माण करु नये. तसेच अर्जदार याने न्यायालय अथवा तपासी अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास वाहन हजर करण्याबाबतचे बंधपत्र सादर करावे.

४) अर्जदाराने त्याच्या नावाने वाहनासंबंधी सर्व आवश्यक कागदपत्रांच्या स्वाक्षांकित प्रती तपासी अधिकाऱ्यांकडे सादर कराव्यात.

५) अर्जदाराने यापुढे सदर वाहनाचा वापर कोणत्याही बेकायदेशीर अथवा गुन्हेगारी कृत्यासाठी करु नये.

६) तपासी अधिकाऱ्यांनी वाहनाचा सविस्तर पंचनामा करून चारही बाजूंनी छायाचित्रे काढावीत व त्यासंबंधीचे पंचनामे, छायाचित्रे व बंधपत्र दोषारोपपत्रासोबत न्यायालयात सादर करावीत.

७) पंचनामा व छायाचित्रणासाठी लागणारा खर्च अर्जदाराने करावा.

RENUKA SUDHIR MORE
Digitally signed by RENUKA SUDHIR MORE
Date: 2026.08.04 16:55:36 +0530

**(रेणुका सुधीर मोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.६) जळगांव.

दिनांकः ०४/०८/२०२६.